महाराष्ट्र शासन
# उपजिल्हा रुग्णालय कणकवली.

फोन नंबर(कार्या.) :- (०२३६७)२३३९५९
अपघात कक्ष :- २३२०५८
प्रसुति कक्ष :- २३२४३१

नरडवे रोड,कोर्टाजवळ, मु.पो.ता. कणकवली
जिल्हा सिंधुदुर्ग. पिन ४१६६०२
Email id :- ms_sdhkankavali@yahoo.co.in

आरोग्य सेवा

जा.क्र.उजिरुक/आस्था/एनएचएम/आरबीएसके कंत्राटीवाहन/ 6263 /२५
दिनांक :- ३० /१० /२०२५

फेरनिविदा

## वाहन भाडेतत्तावर घेणेसाठी दरपत्रक

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत तालुकास्तारवर आरबीएसके कार्यक्रमासाठी .दोन वाहने भाडेतत्वावर घेणेत येणार असून वाहनाची मुदत ३१ मार्च २०२६ किंवा राज्यस्तरावरुन वाहनांची निविदा प्रक्रिये पूर्ण होई पर्यंत यापैकी जे अगोदर होईल याचे अधिनराहून भाडेपद्धतीने घेणेसाठी वाहन मक्तेदारांकडून सिलबंद लखोटयामध्ये दरपत्रके मागविणेत येत आहेत. दरपत्रकाच्या खालीलप्रमाणे अटी व शर्ती असतील.

१) दरपत्रक विहित नमुन्यात व मुदतीत या कार्यालयाकडे पोहोचणे आवश्यक आहे.
२) उशिरा प्राप्त झालेले दरपत्रक स्विकारले जाणार नाही.
३) सिलबंद लखोटयावर **राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरबीएसके कक्षासाठी वाहन भाडेतत्तावर पुरविणेसाठी दरपत्रक** असा उल्लेख करावा.
४) **४+१ सीट T-Permit असणे आवश्यक आहे.**
५) वाहने हि मागील ८ वर्षे कालावधीपेक्षा जुनी नसणे बंधनकारक आहे.
६) वाहनाची मर्यादित धाव **१५०० किमी प्रति महा** या मर्यादेत निश्चित करणेत आलेली आहे.
७) सदरील वाहन हजर तारखेपासून **३१ मार्च २०२६ किंवा राज्यस्तरावरुन वाहनांची निविदा प्रक्रिये पूर्ण** होईपर्यंत ग्राहय राहिल.
८) १०० रु. चे बॉन्डवर विहित सर्व अटी व शर्थी करारपत्रकावर लिहून देणे बंधनकारक असेल.
९) वाहन सेवा ही २४ X ७ कालावधीसाठी वाहन चालकासह तालुका स्तरावरील ग्रामीण / उपजिल्हा रुग्णालय येथील कार्यालयासाठी उपलब्ध असावी, त्यासाठी चालकाला कुठलाही अतिरिक्त भत्ता दिला जाणार नाही.
१०) दरपत्रकासोबत आरसी बुक, वाहनाचा विमा, प्रवासी वाहतुक परवाना, पॅनकार्ड, पीयुसी, वाहनचालकाचे ड्रायव्हिंग लायसन्स ही व आवश्यकतेप्रमाणे इतर प्रमाणपत्रे स्व-साक्षांकित करुन सोबत जोडणे बंधनकारक आहे.
११) वाहने हि ४+१ सीट असलेली बंद बॉडी वा तत्सम स्वरुपातील व Engine capacity 1000 CC च्या वर असणे आवश्यक आहे.
१२) पुरविल्या जाणाऱ्या वाहनांची सर्व कागदपत्रे अद्ययावत विमा, नोंदणी पुस्तक, रोड टॅक्स, पेमेंट आवश्यकतेनुरुप राज्यातील कायद्यानुसार सोसायटीला पुरवावी लागतील.
१३) दरपत्रक धारकाने सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचून आणि समजावून घेवून दरपत्रक सादर करावे. शंका असल्यास त्याबद्दल स्पष्टीकरण घ्यावे. परंतु त्यासाठी दरपत्रक सादर करण्यासाठी दिरंगाई करता येणार नाही.
१४) दरपत्रक धारकाने आपल्या वाहन भाडयाचे दर अंकात आणि अक्षरात अशा दोन्ही स्वरुपात स्पष्ट करावेत. दोन्ही मध्ये फरक आढळल्यास अक्षरी दर वैध ठरविला जाईल.
१५) दरदत्रक सादर करताना मुद्रणात झालेली खाडाखोड साक्षांकित करुन पूर्ण स्वाक्षरीसह दरपत्रक धारकाने सादर करावी.
१६) वाहनाच्या चालकाला कार्यालयाच्या परिक्षेत्रात येण्यासाठी सुरक्षेच्या वर्तमान कायद्यानुसार ओळखपत्र काढण्याची जबाबदारी वाहन मक्तेदाराची राहील. ओळखपत्राशिवाय चालकाला कार्यालय परिक्षेत्रात

प्रवेश करता येणार नाही. तसेच वाहन चालविण्याचा चालकाची परवान्याची साक्षांकित प्रत कार्यालयास सादर करावी.

१७) मक्तेदाराने प्रतिष्ठीत अशा विमा कंपनीकडून त्याच्या वाहनाची वाहन आणि प्रवासी यांसह सर्वकर्ष विमा पॉलिसी काढलेली असावी. कंत्राटदाराने मुळ विमा पॉलिसी आणि पॉलिसीचे हप्ते आणि चार्जेस भरले असल्याचे पुरावे सिंधुदुर्ग जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, आरबीएसके जेव्हा मागेल तेव्हा पुरविणे आवश्यक आहे.

१८) कराराच्या दरम्यानच्या काळात वाहनांच्या भागांची टायर, ल्युब्रीकंटस, डिझेल आदिंच्या किंमतीत वाढ झाल्यास कुठल्याही प्रकारे दर वाढविले जाणार नाहीत / तशी मागणी करता येणार नाही.

१९) ज्या कालावधीत वाहन उपलब्ध नसेल त्या कालावधीमध्ये दुसऱ्या वाहनाची व वाहन चालकाची पर्यायी व्यवस्था करणे बंधनकारक राहील. ती न केल्यास पर्यायी व्यवस्थेसाठी जो खर्च केला जाईल तो देयकांतून वसुल करणेत येईल. कोणत्याही कारणामुळे वाहन उपलब्ध करुन न दिल्यास पहिला एक तास वगळता पुढील प्रत्येक तासासाठी किंवा तासाच्या भागासाठी रु.५०/- (रुपये पन्नास मात्र) इतकी देय रकमेतून वजा केली जाईल अथवा वसुली केली जाईल.

२०) देयक सादर करताना लॉगबुक पडताळणी करीता सादर करावे. वाहन वापरलेल्या अधिकाऱ्याची सही तसेच वैद्यकिय अधिक्षक, ग्रा.रु./उपजिल्हा.रु. यांचे सही लॉगबुकवर घेणे बंधनकारक आहे. लॉगबुक सादर न केल्यास देयके पारीत करता येणार नाहीत. परिपुर्ण लॉगबुक सादर करणेची जबाबदारी वाहनधारकाची राहिल.

२१) कोणतेही कारण न देता वाहनासाठी केलेला करार केव्हाही संपुष्टात आणण्याचा अधिकार वैद्यकिय अधिक्षक यांनी राखून ठेवलेला आहे.

| अ.क्र. | वाहनाचा सविस्तर तपशिल | रक्कम प्रति किमी |
|---|---|---|
| १ | ४+१ सीट T-Permit ( Engine capacity 1000 CC च्या वर) | |

दरपत्रके सिलबंद लखोटयात दिनांक ०६/१०/२०२५ सकाळी ११.०० वाजेपर्यंत वैद्यकिय अधिक्षक कार्यालयिन टपालात आणून देणेची आहेत. सदर दरपत्रके शक्यतः त्याच दिवशी दुपारी.१२.३० वाजता सहभागी मक्तेदारांचे उपस्थितीत अथवा मक्तेदार उपस्थीत न राहिल्यास त्यांच्या अनुपस्थीतीमध्ये उघडण्यात येतील. संबंधित वाहन मक्तेदारांनी दरपत्रक उघडतेवेळी उपस्थित रहाणे अनिवार्य आहे. अनुपस्थित राहणा-या मक्तेदारांचे हरकतीची दखल घेतली जाणार नाही. याची मक्तेदारांनी नोंद घ्यावी.

शासकीय उपजिल्हा रुग्णालय कणकवली, सिंधुदुर्ग

वैद्यकिय अधिक्षक गट-अ
उपजिल्हा रुग्णालय कणकवली
वैद्यकिय अधिक्षक गट-अ
उपजिल्हा रुग्णालय कणकवली
ता-कणकवली जि-सिंधुदुर्ग

प्रत –

**1- कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्दीसाठी**

2-www.nrhm.maharashtra.gov.in
3-www.arogya.maharashtra.gov.in
4-it.nhm-mh@nic.in
प्रत माहितीसाठी
मा. जिल्हा शल्य चिकित्सक,जिल्हा रुग्णालय सिंधुदुर्ग